# आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना भाषेमुळे येणा-या समस्यांचा अभ्यास

**धायगुडे अनिता कुमार**
अध्यापक महाविद्यालय, वडगाव मावळ

........................................................................................................................................

**सारांश :** अति प्राचिन काळी मानव डोंगर द-यामध्ये रहात असे. त्यावेळी ते ग्रुप करून म्हणजे गटागटाने रहात असत. जसजसा मानवाचा विकास झाला तो एकत्र राहू लागला. भाषेशिवाय माणूस हातवारे, खाणाखुणा, हावभाव यांच्या सहायाने विचारांचे प्रगटीकरण करत असे. परंतु मानव उत्क्रांत होत गेला तशी त्याला भाषेचे महत्व पटले. आज भाषा मानवी जीवनाचा अविभाज्या भाग झाला आहे. आज जगभर वेगवेगळ्या अशा ६९०९ बोली भाषा आहेत. ज्यांचा अभ्यास चालू आहे. या बोली भाषा म्हणजेच प्रत्येक व्यक्तिची स्वतःची मातृभाषा होय. प्रत्येक तज्ञानी मातृभाषेचे अनन्यसाधारण स्थान मान्य केलेले आहे. जननी व जन्मभूमीला जोडणारा दुवा म्हणून मातृभाषेला महत्वाचे स्थान आहे. व्यक्ति स्वतःचे विचार, भावना अनुभव भाषेच्या माध्यमातून व्यक्त करत असतो. अशा वेळी शिक्षणाचे माध्यम ही मातृभाषा असणे आवश्यक आहे. हे सर्व शिक्षणतज्ञाचे मत तर आहेच त्याच बरोबर वकगवेगळ्या आयोगानी देखील हया शिफारशी केलेल्या आहेत. असे असताना डोंगर द-यात रहाण-या आदिवासींना मातृभाषेतून शिक्षण मिळते का हे अभ्यासणे आवश्यक आहे. यासाठी संशोधकाने उपरोक्त विषयाची निवड केली आहे.

---

**प्रस्तावना :** प्रत्येक समाजाच्या विकासामध्ये भाषा हे महत्वाचे साधन होते. भाषा हा शब्द संस्कृत धातूपासून तयार झाला त्याचा अर्थ बोलणे असा आहे. भाषेच्या वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत.

१. ब्लॉक व ट्रॅगर : भाषा ही ध्वनियुक्त चिन्हांची अशी स्वैच्छिक पध्दती आहे की जिच्या मदतीने सामाजिक गट संप्रेषण व एकमेकांशी सहकार्य करू शकतो.

२. सेपिर : स्वतःचे विचार , भाव तसेच इच्छा, कल्पना निर्मित ध्वनिचिन्हांच्या माध्यमाने संप्रेषित करण्यासाठी पूर्णपणे मानवाने प्रयत्नपूर्वक निर्माण केलेली, उपजत नसलेली पध्दती म्हणजे भाषा. व्यक्तिला स्वतःचे विचार, भावना, प्रभावीपणे मांडण्याचे माध्यम मातृभाषा असते. त्यामुळेच महात्मा गांधीजींनी शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे हे बुनियादी शिक्षणामध्ये व्यक्त केले आणि त्याची अंमलबजावणी देखील केली. आज भारतातील सर्वच राज्यातील विद्यार्थी मातृभाषेतून शिक्षण घेतात का? हा प्रश्न निर्माण होते. तसेच विकासापासून कोसो दूर असणा-या दुर्गम जमातीतील मुलाना शिक्षण घेत असताना अडचणी येतात का? त्याचे स्वरूप काय? याचा विचार करणे आवश्यक आहे. प्रमाण भाषा समजण्यास अडचणी येतात. त्यासाठी शासनाकडून काही प्रयत्न केले जातात का हे जाणून घेण्यासाठी या विषयाची निवड केली.

**गरज :** भाषा हे विचार व्यक्त करण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. आज आपण ज्ञानरचनावादाचा अभ्यास करत असताना पूर्वज्ञानाला खूप महत्व देतो हे पूर्वज्ञान जर त्याना मातृभाषेतून मिळाले जर त्यांच्या सर्व संकल्पना हया स्पष्ट असतील तर पुढील ज्ञानात अडचणी निर्माण होणार नाही. भाषा समृध्द असेल तर व्यक्तिचा विकास, आचारविचार राहणीमान यांच्यात सुधारणा होतील. कोणतीही भाषा आत्मसात करताना जर मातृभाषा समृध्द असेल जर सोपे जाते. भाषा ही दर १२ मैलावरती बदलत असते अस म्हणतात. अस तर सर्वसामान्यांच्या बाबत असेल तर ज्यांचा कधीही शहरातील लोक वस्तीशी संपर्क नसेल तर त्याना या समाजाशी जुळवून घेताना, व्यवहार करताना अनेक अडचणी येतात. अशासाठी कोणत्या भाषेचा वापर केला पाहिजे जेणे करून संवाद वाढतील याचा विचार केला पाहिजे. भारतामध्ये एकूण १२६१ भाषा बोलल्या जातात. त्यातील २२ भाषांना अभिजात भाषांचा दर्जा आहे. अशावेळी मातृ भाषेतून सर्वांना शिक्षण देणे व्यवहारीक दृष्टया शक्य होत नाही. अशा वेळी विद्यार्थ्यांना कोणत्या अडचणी येतील हे शोधणे गरजेचे आहे.

**समस्या विधान :** उढेवाडीतील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना भाषेमुळे येणा-या समस्यांचा अभ्यास करणे

**संशोधनाची उददिष्टे :**

१. आदिवासी विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेतून शिक्षण घेताना येणा-या अडचणींचा शोध घेणे.

२. आदिवासी विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेतून शिक्षण घेताना येणा-या अडचणींचे वर्गीकरण करणे.

३. . आदिवासी विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेतून शिक्षण घेताना येणा-या अडचणींवर उपाययोना सुचवणे.

**कार्यात्मक व्याख्या :**

१. उढेवाडी : लोनावळा शहरापासून १७ किलोमीटर वरील एक गाव ज्याची ९० टक्के लोकसंख्या आदिवासी आहे.

२. आदिवासी विद्यार्थी : उढेवाडीतील अनुसूचित जमातीतून आलेले विद्यार्थी.

३. भाषा : महाराष्ट्रातील शालेय अभ्यासक्रमामध्ये वापरण्यात येणारी प्रमाण मराठी भाषा

**गृहितके :**

१. आदिवासी विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेतून शिक्षण घेताना अडचणीं येतात. ( मोरे २००३, व गारे २००२)

२. आदिवासी भाषेला कोणतीही लिपी नाही. ( गारे १९९६)

३. आदिवासी विद्यार्थ्यांना स्वतःच्या भाषेतील पुस्तके मिळत नाही. ( मारकड २०१३, पिचड २०००)

**संशोधन प्रश्न :**

१. आदिवासी विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेतून शिक्षण घेताना अडचणीं येतात का?

२. आदिवासी विद्यार्थ्यांना प्रमाण भाषा सहज समजते का?

**संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा :**

१.हे संशोधन लोनावळा शहराजवळील उढेवाडी येथील ७ वी इयत्तेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

२.प्रस्तुत संशोधन हे शालेय स्तरावर वापरण्यात येणा-या भाषे पुरते मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे भाषेमुळे निर्माण होणा-या समस्यापुरते मर्यादित आहे .

**मर्यादा व परिमर्यादा :**

१.प्रस्तुत संशोधन हे उढेवाडीतील जिल्हा परिषदेच्या शाळेतील इयत्ता ७ वीच्या २७ विद्यार्थ्यां पुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे प्रमाण भाषेमुळे येणा-या समस्यांपुरतेच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे ?शैक्षणिक वर्ष २०२० - २१ या सालापुरतेच मर्यादित आहे.

**न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधन हे उढेवाडीतील जिल्हा परिषदेच्या शाळेतील इयत्ता ७ वी च्या वर्गातील सर्व विद्यार्थी.

**नमुना :**

सहेतुक नमुना निवड पध्दतीने प्रतिसाद देणा-या इयत्ता ७वीच्या वर्गातील १२ मुले व १५ मुलींची निवड करण्यात आली. अशा एकूण २७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

**माहिती संकलनाची साधने :**

आधारसामग्री संकलित करण्यासाठी वापरण्यात येणा-या साधनांना माहिती संकलनाची साधने म्हणतात.प्रस्तुत संशोधनात संशोधक निर्मित प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात आला. सर्व प्रतिसादकांकडून १० प्रश्न असणारी प्रश्नावली भरून घेण्यात आली. यामध्ये त्यांचे शुध्दलेखन, लेखन क्षमता तपासता येतील असे प्रश्न होते.

**माहिती विश्लेषणाची साधने :**

संकलित केलेली माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी ज्या संख्याशास्त्रीय साधनाचा उपयोग केला जातो त्यास संख्याशास्त्रीय साधने म्हणतात. संशोधकाने टक्केवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा उपयोग केला. संशोधकाने बद्ध प्रश्न विचारून त्या प्रश्नांच्या पर्यायांची वारंवारिता काढली. त्याप्रमाणे प्रत्येक पर्यायाला किती टक्के प्रतिसाद दिला हे काढले.

**निष्कर्ष :**

१. आदिवासी विद्यार्थ्यांचा समाजाशी संबंध येत नसल्याने त्याना शिक्षकांची भाषा लगेच समजत नाही.

२. आदिवासी विद्यार्थ्यांना पुस्तकातील उदाहरणांचा अर्थ कळत नाही कारण त्या गोष्टी त्यांच्यासाठी पुर्णपणे नविन आहेत.

३. आदिवासी विद्यार्थ्यांच्या मुलभूत संकल्पना स्पष्ट झालेल्या नाहीत.

४. आदिवासी भागातील बोली भाषा शिक्षकांना येत नाही.

५. शिक्षक शहरी भागातील असल्यास विद्यार्थी शाळेत येण्यास नकार देतात कारण त्यांची भाषा विद्यार्थ्यांसाठी अनोळखी वाटते.

६. शालेय पाठयपुस्तकात आदिवासी विद्यार्थ्यांचा विचार करून उदाहरणे किंवा चित्रे नाहीत.

७. अभ्यासक्रमामध्ये आदिवासींच्या दैनंदिन गरजा किंवा व्यवहाराबाबत कोणतीही माहिती नसल्याने विद्यार्थी शाळेत येण्याचा कंटाळा करतात.

**उपाययोजना :**

१. आदिवासी विद्यार्थ्यांच्या भाषेचा अडसर दूर करण्यासाठी प्राथमिक स्तरापर्यंत त्याना त्यांच्या बोलाभाषेचे सुदधा शिक्षण दिले जावे.

२. अभ्यासक्रमाची रचना त्यांच्या जीवनाशी संबंधीत असावा.

३. आदिवासींची बोलीभाषा समजणा-या शिक्षकाची तेथे नेमणूक केली जावी.

४. जीवनाशी सांगड घालणारे शिक्षण व अभ्यासक्रम असावा.

५ . काही पुस्तके ही त्यांच्या बोली भाषेत असावीत.

## संदर्भसूची

१. डॉ . नरवणे मिनल, “भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या” (२००८) नित्यनूतन प्रकाशन पुणे

२. डॉ. रणसूरे विलास “मराठीचे आशययुक्त अध्यापन” (२००६) संघमित्रा प्रकाशन, मिरज

३. डॉ.गारे गोविंद, सोनवणे उत्तमराव, आदिवासी कला (१९९३) गमभन प्रकाशन, पुणे

४. डॉ.चवरे रा.गो. आंध जमात लोकसाहित्य आणि संस्कृती (२०१६) शब्दवैभव प्रकाशन, पुणे